

पेठनाका (ता. वाळवा) येथील महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या विभागीय क्रीडा परिषदेच्या बैठकीवेळी डॉ. प्रकाश गायकवाड, प्रा. महेश जोशी, जिल्ह्यातील शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते.

# क्रीडा परिषदेचे यजमानपद ही मोठी जबाबदारी : गायकवाड

लोकमत न्यूज नेटवर्क

**इस्लामपूर :** सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे यजमानपद ही एक मोठी जबाबदारी आहे. ती यशस्वीपणे पार पाडण्याचे कसब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयाने दाखविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या विविध स्पर्धांचे आयोजन ते क्रीडा परिषदेचे यजमानपद अशी मोठी मजल मारणारे हे महाविद्यालय गौरवास पात्र आहे, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. प्रकाश गायकवाड यांनी काढले.

येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या सांगली विभागीय क्रीडा परिषदेच्या अंतिम बैठकीत ते बोलत होते. व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, डॉ. अंकुश बेलवटकर प्रा. महेश जोशी, अशोक काळे, प्रा. सुधीर वाटवे, प्रा. विजयानंद गदरे, प्रा. संदीप पाटील, प्रा. अशितोष साळुंखे, प्रा. अमृत पाटील, शुभम सकटे, प्रीतम रोकडे उपस्थित होते.